# सायबर वॉरियर्स सिद्धी वेलोंडे आणि स्नेहल वाघमारे यांचा डिजिटल सुरक्षिततेचा अभिनव उपक्रम

**बाळकद्दू : प्रदीप तळेकर**

**रत्नागिरी :-** क्विक हील फाऊंडेशनच्या पुढाकाराने आणि पाटकर-वर्दे महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने एम.टी.एस. खालसा हायस्कूल, गोरेगाव (पश्चिम) येथे १ ऑगस्ट २०२६ रोजी सायबर सुरक्षा जागरूकता सत्राचे यशस्वी आयोजन करण्यात आले.



क्विक हील फाऊंडेशनच्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या अभियानांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाची यंदाची संकल्पना ''माझा डेटा, माझी जबाबदारी'' ही होती. डिजिटल युगात वैयक्तिक माहितीचे संरक्षण, सुरक्षित ऑनलाइन व्यवहार आणि जबाबदार डिजिटल नागरिक घडविणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. या सत्रात पाटकर-वर्दे महाविद्यालयाच्या प्रशिक्षित विद्यार्थी सायबर वॉरियर्स सिद्धी वेलोंडे आणि स्नेहल वाघमारे यांनी प्रभावी सादरीकरण करत विद्यार्थी व शिक्षकांना डेटा संरक्षण व गोपनीयता, ऑनलाइन फसवणूक ओळखणे, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर तसेच सायबर गुन्ह्यांची तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. एम.टी.एस. खालसा हायस्कूलच्या प्रतिनिधींनी या उपक्रमाचे कौतुक करत आजच्या तंत्रज्ञानप्रधान युगात विद्यार्थ्यांसाठी सायबर साक्षरता अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले. तसेच पाटकर-वर्दे महाविद्यालय, विद्यार्थी सायबर वॉरियर्स आणि क्विक हील फाऊंडेशन यांनी राबविलेल्या या जनजागृती मोहिमेबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले. क्विक हील फाऊंडेशन आणि पाटकर-वर्दे महाविद्यालयाच्या संयुक्त प्रयत्नातून राबविण्यात येणारे असे उपक्रम तरुण पिढीमध्ये डिजिटल सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करून जबाबदार व सुरक्षित डिजिटल नागरिक घडविण्यास मोलाचे योगदान देत आहेत.